**१६) जांबनाला प्रकल्प :-**

जांबनाला लघु प्रकल्प यवतमाळ जिल्हयातील महागांव तहसीलमधील बोथा गांवाजवळील स्थानिक नाल्यावर बांधण्यात आला आहे. प्रकल्पाच्या माती धरणाची लांबी १७४५ मी. असून पुंडी पध्दतीच्या सांडव्याची लांबी ११६ मी. आहे. प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्याची लांबी १४.३४ किमी असून कालवा व उपसाव्दारे महागांव तालुक्यातील ११८४ हे.सिंचन क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळू शकतो.

सद्य:स्थितीत मुख्य कालवा १४.३४० कि.मी. वरील नाल्यावर सिमेंट बंधाऱ्यांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. जुन २०१६ पावेतो सदर काम पुर्ण होऊन १०० टक्के सिंचन क्षमता निर्मिती (११८४ हे.) होईल.

## प्रकल्पांचे नाव :- जामनाला प्रकल्प

तालुका : महागांव जिल्हा : यवतमाळ

### (अ) ठळक वैशिष्टे

| जलग्रहण क्षेत्र | पिण्याचे पाणी आरक्षण | प्रकल्पीय पाणीसाठा | निर्मीत पाणीसाठा | प्रकल्पीय सिंचन क्षमता | निर्मीत सिंचन क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| ४२.०० चौ.कि.मी. | निरंक | ९.६८ दलघमी | ९.६८ दलघमी | ११८४ हे. | ११०४ हे. |

### (ब) प्रशासकीय / आर्थिक बाबी

- प्रशासकीय मान्यता :- रू.६.६८ कोटी दि. ०९/०३/१९९४
- सुधारित प्रशासकीय मान्यता रू. २६.०६ कोटी दि. ०८/०१/२०१०
- अद्यावत किंमत- रु.४४.३१ कोटी
- सन २०१५-१६ चे उपलब्ध अनुदान- रु. (-) ०.३५ कोटी (मागील शिल्लक + उपलब्ध अनुदान)
- ( (-) ३.३५ + ३.०० )
- मार्च २०१५ अखेर झालेला खर्च- रु.३५.५१ कोटी
- कामाची सद्य:स्थिती - धरण - १०० टक्के
  सांडवा - १०० टक्के
  कालवे - ८० टक्के
  वितरण प्रणाली - ८० टक्के

| | आवश्यक जमिन | संपादित जमिन |
|---|---|---|
| १) खाजगी जमिन | २६४.७५ हे. | २६४.७५ हे. |
| २) सरकारी जमिन | ०.०० हे. | ०.०० हे. |
| ३) वनजमिन | २४.३१ हे. | २४.३१ हे. |

- आवश्यक भुसंपादन :- (वरीलप्रमाणे)

- पुर्नवसन- आवश्यकता नाही.
- प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन-

| वर्ष | निधी | साठा निर्मिती | सि.क्ष.नि |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | ८.८० कोटी | -- | ८० हे. |

- **नियोजनानुसार काम पुर्ण करण्यास अडचणी** - १) सुप्रमा २) निधीची अडचण